# प्रभुतरुण

वर्ष ५२ | अंक १२ | मुंबई | जुलै, २०१९ | पाने ६ | किंमत रु. १

(*स्थापना :* तारीख २५ ऑगस्ट १९२३)

**तत्त्वाचा बंदा जीव । मूर्तीला कोण विचारी?**

**www.prabhutarun.org**

*संपादिका:* **सुहासिनी कीर्तिकर** *कार्यकारी संपादक मंडळ :* **मिनाक्षी जयकर, मयुरा नायक, संजना कोठारे, वैजयंती कीर्तिकर**

*सहाय्यक संपादक:* **त्वरिता दळवी, राजेश नवलकर, भक्ती शेटये**


*संपादकीय*

## चार सख्य...

—सुहासिनी कीर्तिकर

आत्ताआत्ताच गिरीश कर्नाड गेले. बादल सरकार, मोहन राकेश, विजय तेंडुलकर आणि गिरीश कर्नाड यांचे रंगभूमीसाठी फार मोठे ऐतिहासिक योगदान आहे. कर्नाड गेल्याची बातमी वाचली आणि मला नगरचे अखिल भारतीय मराठी साहित्यसंमेलन आठवले. या संमेलनाचे उद्घाटक होते गिरीश कर्नाड. स्वागताध्यक्ष होते यशवंतराव गडाख. गडाख अतिशय शांत, मितभाषी अन् अगत्यशील. कवी, संपादक अरुण शेवते त्यांचा सन्मित्र. शेवतेंच्या सल्लामसलतीने या संमेलनस्थळी आगळेवेगळे आयोजन होते. म्हणजे संमेलनाच्या पूर्वसंध्येला यशवंतराव गडाखांच्या शेतावरील बंगल्यात निमंत्रितांचे छोटेसे (भेटीगाठीसाठी) संमेलन होते. नजर विस्फारेल असा पांढऱ्या कनातीचा मोठा तंबू. त्यात स्वच्छ पांढऱ्या गाद्यागिर्द्या, लोड... अशी बैठक. तंबू बाहेर छोट्याशा पटांगणात चार चार, पाच पाच खुर्च्या गोलाकारात मांडून मध्यभागी थंडी पळविण्यासाठी घमेल्यात धगधगता विस्तव. मोकळ्या हवेत, शिरशिरता गारवा अनुभवत निमंत्रित खुर्च्यांमध्ये गप्पाष्टकांसाठी विसावलेले. आठवतंय्; माझ्या शेजारी डॉ. गं. ना. जोगळेकर, मधु जामकर, पद्मा घारपुरे... गप्पा रंगत होत्या. गिरीश कर्नाड एकाचएका खुर्चीवर न विसावता साधेपणाने उठून सगळ्या खुर्च्याखुर्च्यांतून विसावलेल्या मंडळींना भेटत, बोलत, ओळख करून घेत होते. खादीचा अंजिरी रंगाचा झब्बा, पांढराशुभ्र लेंगा, चेहरा देखणा पण नम्र भाव असलेला. ते आमच्यापर्यंत आले. ओळख करून घेतली. त्यावेळी त्यांचा 'चिलुआ' नावाचा कन्नड चित्रपट राष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित झाला होता. त्यात सोनाली कुलकर्णी (सीनियर) झाड झाली होती. डॉ. गं. ना. जोगळेकर सहज म्हणाले, ''सोनाली माझी विद्यार्थिनी बरं का.'' कर्नाड चटकन जोगळेकरांच्या पायाशी वाकले. म्हणाले, ''तरीच ती इतकी हुशार, तडफदार''. या त्यांच्या प्रतिक्रियेत अजिबात नाटकीपणा नव्हता. सुसंस्कृत भाव होता. त्यानंतर तंबूमध्ये मुख्य संमेलनाआधीचे हे छान कविसंमेलन रंगले. कर्नाडांनी आपल्या (की आणखी कुणाच्या?) कन्नड कविता वाचल्या. नंतर त्यांचं मराठी रूपांतर सादर केले. हे कविसंमेलन आठवणीत राहिले आहे. त्यानंतर दुसऱ्या दिवशी सकाळी संमेलनाचे उद्घाटन. यावेळी मात्र उद्घाटक म्हणून कर्नाडांचा औपचारिक वावर होता... अन् ते त्यांचे त्यावेळी गाजलेले स्पष्टोक्ती असलेले भाषण! साहित्यिकांच्या स्वातंत्र्याचा उच्चार करणारे, सरकारी भूमिकेला चार शब्द सुनावणारे! 'कावळा शिखरावर बसला म्हणून तो गरुड होत नाही... न काकोपि गरूडायते!'- असे ठणकावून सांगणारे. उद्घाटकांच्या या निर्भीड आणि स्वच्छ भूमिका मांडणाऱ्या भाषणासमोर संमेलनाध्यक्षांचे, ना. सं. इनामदारांचे भाषण अगदीच 'इनामदारी' राखणारे झाले. कर्नाड जनमानसात शिखरावरच राहिले.

गिरीश कर्नाडांच्याच आगेमागे 'बाबा' म्हणजे म. सु. पाटील गेले. मुलुंड कॉलेजच्या माझ्या कार्यकाळात त्यांच्या मुलुंडच्या घरी माझे अनेकदा जाणे होई. त्याची एक मुलगी (नीरजा नव्हे!) माझी विद्यार्थिनी. माझ्या 'दृष्टिक्षेप' सदरावर ते सविस्तर बोलत. सविस्तर म्हणजे अगदी माझ्या लेखातील शब्दाशब्दावर बोट ठेवत. त्यांच्या माझ्याकडून बऱ्याच अपेक्षा होत्या. मग त्यांच्या 'अनुष्टुभ'मध्ये कधीमधी त्यांनी मला लिहीते केले. एखादी गुजराती, हिंदी कथा देऊन त्यांचे भाषांतर, एखाद्या चित्रावर माझे टिपण, डॉ. महेश केळुसकरच्या पुस्तकावर झालेल्या चर्चासत्रातील माझ्या विचारांना खास प्रसिद्धी... हे ठीकच. पण त्यांच्याबरोबरच्या गप्पात साहित्याचा मोठा पट उलगडत असे. अगदी सौम्यपणे. ते बोलतच हळूवारपणे. पुढे मी 'साहित्य'ची संपादक झाल्यावर तर त्यांनी फोनवर माझं अभिनंदन करून अतिशय मोलाच्या अनेक सूचना केल्या. अंक प्रकाशित झाल्यावर न मागता न चुकता प्रतिक्रिया दिल्या. मार्गदर्शन केले. संपादक गो. तु. पाटील हे त्यांच्या गोतावळ्यातील. ते प्रसंगोपात्त भेटले तर सांगायचेच की '' 'बाबा' तुमच्या साहित्यिक समजदारीवर खूष आहेत.'' अगदी अलीकडे (म्हणजे जानेवारीत) मुंबई मराठी साहित्य संघाचे कल्याणला महानगरीय मराठी साहित्य संमेलन झाले. त्याच्या अध्यक्ष होत्या नीरजा; आणि सहयोग म्हणजे तिच्या हस्ते म. सु. पाटील यांना साहित्य संघाचा जीवनगौरव सन्मान दिला गेला. नव्वदीत असूनही ते आले होते. नीरजाने मंचावरून खाली उतरून सभागृहात त्यांचा (म्हणजे वडिलांचा) सत्कार केला. त्या समारंभात त्यांची माझी झालेली शेवटची भेट. आता त्यांच्या पुस्तकांतून ते मला भेटतच रहातील.

सोलापूरचे लेखक ल. सि. जाधवही याच सुमारास दिवंगत झाले. गंमतीचा योग म्हणजे ते नोकरीतून निवृत्त झाले अन् लिहायला लागले. पहिलं पुस्तक आलं त्याचं ते म्हणजे 'होरपळ' हे त्यांचे आत्मकथन. त्यावर मी 'दृष्टिक्षेप' टाकला. त्यातून त्यांचा माझा ऋणानुबंध सुरू झाला. फोनवर ते इतक्या गप्पा मारायचे. त्यांची पत्रंही यायची. हस्ताक्षर उत्तम. म्हणून त्रं. वि. सरदेशमुखांचे ते लेखनिकही होते. जन्मानं मांग (मातंग). बालपण दारिद्र्य, दैन्य त्यांना टक्कर देत गेलेले. माझ्या शिफारशीवरून 'होरपळ'चे हिंदी भाषांतरही झाले. मराठी, हिंदी आत्मकथनाला पुरस्कार मिळाला. पुढे हे आत्मचरित्र कन्नडमध्येही गेले. मग त्यातून उर्जा मिळून त्यांनी आंबेडकरवादी, वैचारिक कादंबऱ्या लिहिल्या. त्याही इतर भाषांत गेल्या. त्यांनाही पुरस्कार मिळाले. आपल्या कादंबऱ्यांचे कथानक ते फोनवर मला सविस्तर सांगायचे. मग मीही फुशारून जाऊन मला माहिती असलेले तपशील, घटना यांची भर घालायचे. ते म्हणायचे, ''कादंबरीत तुमच्या नावानिशी घालतो हे सगळे.'' पण माझा नकार असे साहजिकच. एकदा सोलापूरहून मुंबईला त्यांचा नातलग येणार होता. मला म्हणाले, ''तुम्हाला भेट म्हणून सोलापुरी चादरी पाठवतो.'' त्यालाही मी ठामपणे नकार दिला. त्यांना वाईटही वाटले अन् कौतुकही. त्यांनी मांगांच्या बालपणावर आधारित त्यांच्या विश्वातल्या आगळ्यावेगळ्या बालकविता लिहील्या. आजवर कुणीच असा प्रयोग केला नव्हता. मग हुशारून तशाच कथा लिहिल्या. कविता लिहिल्या. वयाच्या साठीनंतर चौऱ्याहत्तर वयापर्यंत म्हणजे दीड दशकात या लेखकाने चोवीस पुस्तके लिहिली. गाजली. दीड दोन वर्षांपूर्वी त्यांचा चाळीशीतला मुलगा गेला. फोनवर बोलताना, ही बातमी सांगताना अगदी खचून गेले होते ते. म्हणाले, ''सून माझी शिकलेली नाही हो. तिला आता एखादे छोटेसे दुकान घालून देईन. पण माझ्या कुटुंबात फार कटकटी सुरू आहेत. त्यातच हे दुःख. तुम्हा मंडळींना जरा सांगीतले की मनाला वारा लागतो बघा.'' पण मनातल्या या दुःखावेगाला उतार काही पडला नाही, अन् गेलेच ते. साठीनंतर लेखक म्हणून बहराला आलेले हे लक्ष्मण सिद्राम जाधव आता फोनवरच्या आवाजापलिकडे गेले.

कर्नाड, म. सु. पाटील, ल. सि. जाधव ही तीन मोठी लेखकमंडळी आपल्यातून निघून गेली. तर रागिणी पुंडलिक या लेखिका अन् त्याहीपेक्षा विद्याधर पुंडलिकांच्या सहचारिणीही गेल्या. सात-आठ वर्षांपूर्वी साहित्य संघात मी 'लेखकांच्या सहधर्मचारिणी' असा कार्यक्रम संमेलनाचा भाग म्हणून आयोजित केला होता. प्रभाताई केशव पुरोहित, वासंती गंगाधर गाडगीळ, केशव मेश्रामांच्या नंदा सुर्वे आणि रागिणी विद्याधर पुंडलिक यांचा त्यात सहभाग होता. विद्याधर पुंडलिक गेल्यावर रागिणीताईंनी

(पान २ कॉलम १ वर)

# Watson's Esplanade Hotel

**-Rajan Jayakar**



After the demolition of the Fort of Bombay between 1863 and 1864,, the land, which became available due to removal of the fort walls and fitting up the water moat around it by the debri of the wall, was utilized for construction of public buildings, such as Post & Telegraph Office, Public Works Department, Educational institution, University, Libraries, Court etc. In 1864, Mr. John Watson, who was dealer in silk cloth, purchased a plot of land next to where Army & Navy building stands, at the Government auction at Rs.110 per sq. yard. Mr. Watson himself was an Architect and also a Hotelier. He decided to construct a Hotel building not in the Victorian Gothic style stone building, which was then prevalent in Bombay, but instead he preferred to construct a building with columns, beams and girders of iron, which were imported from England and the entire building was assembled with nuts and bolts. It was designed by British Engineer Rowland Mason Ordish. This kind of construction technology was not known in the Eastern world. He started Esplanade Hotel in that building sometime in 1871. It had 130 rooms on the upper floors and 20 suites, finished in teak and Mahogany wood. There was a large Bar, six Billiard Tables and five dining rooms. At that time this hotel was considered to be the best in Bombay and was mostly frequented by European visitors to Bombay. With the growing popularity of the Hotel, Mr. Watson even took over in 1896, the building known as Sirdar Mansion behind Royal Bombay Yacht Club (presently Dhanraj Mahal is standing there) and was called Esplanade Hotel Annex. In January 1896 American author Mark Twain resided in the Hotel. The first cinematograph film was produced by Lumiere Brothers in 1896 and was shown to the audience in Paris. This new invention of motion pictures became so popular that within six months of its first show in Paris, the Lumiere Bros. film was exhibited in the Central Atrium of Esplanade Hotel on 7th July 1896 featuring "arrival of Train" and "Leaving the Factory". The Hotel was so exclusive that it was open only to Europeans and it is said that Jamshedji Tata, the great Parsi industrialist of the late 19 century, and his guests were denied access into the hotel because they were not Europeans. Tata was so disturbed that he vowed that he will construct a much better and bigger Hotel in Bombay, which would be open to all immaterial of caste, creed or nationality. He therefore leased a plot at Apollo Bunder and constructed Taj Mahal Palace Hotel in 1903. By 1909, in Bombay, there were already 15 Hotels, 43 Refreshment rooms, 1839 Eating Houses, 494 Tea and Coffee shops, 73 Cold drink shops, 114 Boarding & Lodging Houses and 36 Boarding Houses. Sometime in 1920's, Esplanade Hotel was sold again by auction and the business of hotel was discontinued. The successive owners neglected the beautiful Iron building and in their anxiety to make money, let out almost the entire building to tenants, who after coming into operation of rent control legislation in India, could not be removed. Subsequently the rent was frozen as of 1st September 1940, with the result, it became almost impossible for the owners of the building to maintain the same and over a period of time it has become dilapidated. At the moment there are about 50 residential and more than 100 commercial occupants including Advocates' Chambers. Many occupants are illegal and some occupants even constructed rooms in the balcony by removing the Burma teak planks and putting concrete slabs, which resulted in some portion of balconies falling down. Now the BMC and MHADA have sent notices asking the occupants to vacate the building. Those notices were challenged in Bombay High Court and High Court directed everybody to vacate the building and now the building is vacant and sealed.

I have been appointed as a Convenor of Greater Mumbai Chapter of Indian National Trust for Art and Cultural Heritage (INTACH) since 1st January 2018. INTACH is a NGO registered in Delhi and has more than 200 Chapters all over India, which provides expertise for conservation of Architectural, natural, and cultural heritage of India. As Convenor of Greater Mumbai Chapter, I can offer to conserve heritage property within the Municipal limits of Mumbai. Greater Mumbai Chapter recently restored the Flora Fountain after 3 years of hard work, to its pristine condition, as it was in 1867 when it was constructed. I, as Convenor, alongwith all-India Vice Chairperson Dr. Sarayu Doshi filed Public Interest Litigation (PIL) in Bombay High Court on 21st June 2019, to prevent the demolition of Esplanade Mansion and obtained opinion of world famous Structural Engineer Mr. Shirish Patel, who constructed the first fly-over in India namely Kemp's Corner fly-over. He opined that the Esplanade Mansion should not be demolished and should be restored. This building is part of UNESCO's World Heritage Ensemble of Victorian Gothic Fort area and Art Deco sites opp. Eros Cinema (one of the building in which I reside) and Marine Drive. There is no such habitable building made of iron anywhere in the world. Since the application for being declared as World Heritage site for the entire area was done by the State Government, it is the bounden duty of State Government to restore it and maintain it. The building is presently owned by private individual and hence we have urged in our Petition that the same should be acquired by the State Government under Land Acquisition Act and pay compensation to the landlord, tenants and occupants, so that the State Government will have control over its restoration and subsequent maintenance. Thereafter restoration can start by first removing all the illegal constructions and replacing non-repairable parts by substituting them with identical material. The process is difficult, tedious and expensive, but not impossible and State Government, which otherwise is hell bent on wasteful expenditure such as erection of World's tallest statue in the sea and another tall statue on Mill land, has to do it, to show that it is concerned about the heritage of the city and that it has the capacity to save and restore any heritage structure in whatever condition. INTACH is there to provide expertise. So Mumbaikar's do not lose hope. We will do it.

✳

संपादकीय

(पान १ कॉलम २ वरून)

आत्मकथनही लिहीले होते. विद्याधर पुंडलिक या लेखकाची पत्नी ही त्यांची एक ओळख, तशीच मोनिका गजेन्द्रगडकर या लेखिकेची आई ही त्यांची दुसरी ओळख. मोनिका साहित्यसंघाच्या कार्यकारिणीवर आहे. त्यामुळे तिच्याकडे मुंबईत असल्या की हमखास साहित्यसंघात, इतर साहित्यिक कार्यक्रमात त्या भेटायच्या. देखण्या, खेळाडू वृत्तीच्या अन् साध्या. 'लेखकांच्या सहधर्मचारिणी' कार्यक्रमात त्या खूप भरभरून बोलल्या. (म्हणजे इतर जणींना त्यांनी बोलायला कमीच वेळ दिला!) तशाच त्या या भेटीतही, मोकळेपणाने बोलायच्या. तरुण मुलगा (अश्विन) गेल्याचे, पती गेल्याचे दुःख पचवून त्या बाईच्या उपजत शहाणपणाने जगण्याला निरोगी मनाने सामोरे जात होत्या. अचानक पाठमोऱ्या झाल्या, गेल्या.

तर ही चांगली, कर्तृत्ववान माणसं कलाजगतातून एकाच कालखंडात मृत्यूने उचलून नेली. त्यांचे वय झाले होते तरीही त्यांच्या जाण्याने हळहळ वाटली. आठवणी दाटून आल्या. संपदा जोगळेकरच्या पुढाकाराने चार मैत्रिणींनी लिहिलेल्या कथांचे 'चार सख्य चौवीस' नावाचे पुस्तक प्रकाशित झालेय. उगाच माझ्या मनात आलं की ही चार माणसं माझ्याशी सख्य असलेली गेली तर या लेखाला नावही 'चार सख्य' असेच द्यावे. असो.

✳

## पत्र प्रतिक्रिया

आदरणीय संपादिका सुहासिनीताई कीर्तिकर, जूनच्या 'प्रभुतरुण' अंकातील आपला 'दमदार रसना पुराण' हा लेख अगदी नावाप्रमाणेच रसदार झाला आहे.

जीभ हा तोंडामधला केवढासा तो अवयव. पण तुम्ही किती बारकाव्याने त्याचे विश्लेषण केले आहे. खूप मजा वाटली. जीभेला तुम्ही सीआयडी, घरंदाज बाईसारखी तोंडात बसलेली, डॉक्टरांनी 'आ'करा म्हटल्यावर शरीराची लक्षणे दाखवणारी सीसीटिव्हिच असे म्हणत रामदास स्वामींचा जिभेवर संयम ठेवण्याचा दाखलाही दिला आहे.

आपला जिभेवरचा लेख फारच रसपूर्ण चविष्ट झाला आहे! आम्ही जिभल्या चाटीत वाचला!!

आपली,

**सौ. मीनल हेमंत जयकर**

भवताल

# भावी पिढीची जडणघडण... सणवार

-प्रणिता प्रभाकर

'कर्मण्ये वाधिकारस्ते मा फलेषु कदाचन।' हे श्रीकृष्णाने अर्जुनाला सांगितलेले बोधपर वाक्य. हे गीतेत जरी सांगितले असले; तरीही आजतागायत त्याचा उल्लेख झालेला दिसून येतो वा काहीजण तो कृतीत उतरवण्याचा प्रयत्न करताना दिसतात. 'तू सतत कर्म करीत राहा, फळाची अपेक्षा ठेऊ नकोस'. वरील श्लोकाप्रमाणे माणसाने खरोखरच निरपेक्ष काम करीत राहिले पाहिजे. स्वत:च्या मोबदल्याचा किंवा फायद्याचा विचार करता कामा नये/करू नये. हे द्वापार युगातील वाक्य असून आजमितीस व पुढील पिढीलाही अनुकूल आहे व होईल.

आमच्या मागील पिढीतील लोक विशेषत: घरातील स्त्रिया थोड्याफार फरकाने पदवी किंवा पदव्युत्तर शिक्षण घेऊन नोकरी करीत होत्या. परंतु त्याहीबरोबर धार्मिक गोष्टी कसोशीने पाळत. त्यानंतरची पिढी म्हणजे ७०-८०च्या दशकातली तरुण पिढी शिक्षण-नोकरी-घर सांभाळून व्रतवैकल्ये पाळण्याचा प्रयत्न करीत. परंतु माझ्या मते तेव्हाच्या तरुण पिढीवर कुणाचाही अंकुश नव्हता किंवा कुठल्याही प्रकारचे बंधन नव्हते. तेव्हाच्या तरुणी घरातील व्रतवैकल्ये किंवा सणवार सांभाळण्यासाठी नोकरीवरून अर्ध्या दिवसाची किंवा पूर्ण दिवसाची सुट्टी घेत असत. त्यामुळे त्यांना एकावेळी दोन दगडांवर पाय ठेवता येत होते. परंतु आत्ताची परिस्थिती वेगळी आहे. आता पूर्वीसारख्या ऊठसूट सुट्ट्या मिळत नाहीत. तसेच त्यांची नोकरीही कायमस्वरूपी प्रकारची (permanent job) राहिलेली नाही. उलट त्यांना नेमून दिलेल्या कामाचे स्वरूप निष्पतीयुक्त/ परिणामाभिमुख (Result Oriented) असते. त्यामुळे त्यांना कामाचा खूपच ताण असतो. अलबत्, कामाचे तासही वाढलेले असतात. पर्यायाने घरी येण्याची वेळ माहीत नसते. अर्थातच आजची पिढी ही 'कर्मयोगी' झालेली आहे. 'धर्मयोगी' नाही. ह्याचा अर्थ असा नव्हे की; त्यांचा देवावर विश्वास नाही किंवा देव मानीत नाहीत. परंतु ते धर्मबंधनात पडण्याचे कटाक्षाने टाळतात. जर त्यांना आपण धर्मबंधनाच्या गोष्टी सांगितल्या तर त्या त्यांना सहजासहजी पटत नाहीत. मग त्याची कारणमीमांसा होते आणि तेव्हा आपली पाचावर धारण बसते. ह्याचाच अर्थ असा की, आजच्या ५५ ते ७५ वयोगटातील पिढीने मुकाट्याने वडिलधाऱ्यांचे ऐकून पुढील वाटचाल केली. मला नाही वाटत की, ह्या पिढीने कधी आपल्या वडीलधाऱ्यांना प्रतिप्रश्न विचारला असेल! जे आपली वडीलधारी मंडळी सांगत ते तसे ऐकून पुढे चालत. विचार करण्याची क्षमता असूनदेखील उगाच वादास तोंड फुटू नये म्हणून गप्प राहून घरच्यांनी सांगितल्याप्रमाणे वागत. काहीजण चर्चा करून आपले मत मांडण्याचा खुजा प्रयत्नही करीत असतील, परंतु वडिलधाऱ्यांचा अपमान न करणे ही आपली परंपरा! त्यामुळे मनाला पटत नसूनही मूग गिळून गप्प बसत. काही जणींनी/जणांनी ऑफिसमध्ये सुटी मिळत नाही असे सांगितले तर 'एक दिवस न गेल्याने काही तुझे ऑफिस बंद पडत नाही' ही मुक्ताफळे ऐकावी लागत. पण उलट बोलण्याची प्राज्ञा नव्हती. म्हणून आपण धार्मिक बाबींमध्ये अनभिज्ञ राहिलो.

या उलट आजची पिढी आहे. ती त्यांच्या कर्मावर जास्त विश्वास ठेवते. आजची वय वर्षे ३० ते ४५च्या वयोगटातील मंडळी आपल्या कामाला जास्त प्राधान्य देतात. त्याचा अर्थ असा नव्हे की, त्यांना आपण सांगितलेल्या गोष्टी अजिबात पटत नाहीत. परंतु त्यांच्या सद्सद्विवेकबुद्धीला अनुसरूनच आपण सांगितलेल्या गोष्टींवर योग्य तो निर्णय घेतील. पटत नसलेल्या गोष्टी शांतपणे चर्चा करून त्याचा सुवर्णमध्य काढण्याचा प्रयत्न करतील. तसेच त्यांची विचारधारा कशी बरोबर आहे; हे ते आपल्याला सर्वतोपरी समजावून सांगण्याचा प्रयत्न करतील; परंतु वायफळ वेळ घालवण्यात त्यांना मुळीच स्वारस्य नसते.

विसाव्या शतकाच्या मध्यापर्यंत देवधर्मावर जास्त विश्वास असायचा. त्यानंतर देवदेवस्की थोड्याफार फरकाने कमी होऊ लागली आणि विसाव्या शतकाच्या अंतिम टप्प्यात तिचे प्रमाण अत्यल्प झाले. म्हणजेच देवाचे देव्हारे माजण्याचे स्तोम बंद झाले. आणि एकविसाव्या शतकात देवधर्म अत्यल्प प्रमाणात दिसून येऊ लागला. चैत्र शुद्ध प्रतिपदा म्हणजे गुढी पाडवा! मराठी वर्षाची सुरुवात, शालिवाहन शक सुरू होणारा दिवस! त्यानंतर चैत्र नवरात्री, रामजन्म, हनुमान जयंती, वैशाखातील अक्षय तृतीया... यानुसार वर्षांच्या बारा महिन्यातील सण व त्या व्यतिरिक्त दर महिन्यातील विनायकी, एकादशी, संकष्टी व तत्सम इतर काही तिथींचे स्तोम लयास गेले. ह्याचे कारण सोपे आहे. ते म्हणजे, माणसाची विचारशक्ती प्रबळ झाली व देवधर्म करण्यापरिस बुद्धीचा योग्य वापर करून; बुद्धीपुरस्सर आपले आयुष्य आणखीन सुखकर कसे करता येईल ह्याकडे झुकू लागली. परिणामी सणवार, व्रतवैकल्ये यांना आपोआपच कात्री लागली. सुट्ट्यांचे प्रमाण खूपच कमी झाले. म्हणजे सार्वजनिक सुट्ट्या हो! पूर्वी श्रावण महिना म्हणजे सणवारांची रेलचेल तसेच सुट्ट्यांचीही! तेव्हा तर दर श्रावण शनिवारी व सोमवारी शाळा कॉलेज तसेच ऑफिसेसना अर्धा दिवस सुट्टी असे. परंतु आता तसे नाही. त्यामुळे सणवारांचे महत्त्व कमी झाले आहे. त्यातल्यात्यात संपूर्ण वर्षभरात गणपती, दसरा आणि दिवाळी हे तीन सर्वात मोठे सण समजले जाऊ लागले आहेत. त्यातूनही गणपती उत्सवाला प्राधान्य दिले गेले आहे आजच्या पिढीकडून; असे दिसून येते. देवधर्मच नव्हे तर दररोजच्या जीवनातील छोट्या-छोट्या गोष्टी म्हणजे, बाळांना दृष्ट लागू नये म्हणून आमच्या लहानपणी दररोज बाळाची आंघोळ झाल्यानंतर त्याला तीट लावणे (काजळाचा ठिपका लावणे), बाळ बाहेर फिरून आले की, घराचा उंबरठा ओलांडायच्या आधी एक तांब्याभर पाणी बाळावरून ओवाळून टाकणे, मीठ हातात देऊ नये; नाही तर भांडणे होतील, कात्री विनाकारण वाजवू नये; नाहीतर संकटे येतात, मांजर आडवे गेले तर काम होत नाही म्हणून सात पावले मागे जाणे वगैरे वगैरे... ह्या ना त्या अनेक गोष्टींना नकारघंटा असायची. आमच्या पिढीने फक्त ऐकण्याचे काम केले, म्हणजे हे करू नको, ते करू नको; परंतु का? म्हणून विचारले गेले नाही (वर नमूद केल्याप्रमाणे) असे जरी असले, तरी आमच्यापरीने आम्ही प्रतिकार करीत गेलो. परंतु आजची पिढी इतकी शास्त्रीय दृष्टिकोनातून विचार करते की, त्यांना वरील सर्व गोष्टी दांभिक वाटतात व ती त्याकडे काणाडोळा करते.

कर्तृत्वाने मोठे व्हा! 'असेल माझा हरी तर देईल खाटल्यावरी' असे म्हणत बसू नका! हा बोध आजची पिढी त्यांच्या पुढच्या पिढीला नक्कीच देईल असे वाटते व ते साहजिकच आहे.

स्थित्यंतर हा जीवनाचा स्थायीभाव आहे म्हणून !!!

*

पान उलटताना

# दिसतं तसं नसतं

-डॉ. सुमन सुवर्णकुमार नवलकर

आई, तू तर म्हणतेस की आजी खूप शिकलीय; पण आजीला साधी एक आणि दोन रुपयांची नाणीही ओळखता येत नाहीत. बसमधून येताना दोन रुपयांऐवजी एक रुपयाचं नाणं दिलं तिने कंडक्टरला. कंडक्टर म्हणाला, 'एक रुपया कमी दिलाय, तर तिने त्यातली सगळी नाणीच त्याच्यापुढे धरून म्हटलं, ''तुम्हीच घ्या आता एक रुपया यातून.''

यावर हसून आईने इतकंच विचारलं, ''चश्मा होता का तुझ्या आजीच्या डोळ्यांना?'' नाही आई, पण अजिबात दिसत नसलेली माणसंपण नीट मोजून देतात पैसे. त्यांच्यापेक्षा तर नक्कीच जास्त दिसतं ना आजीला?'' मानसने विचारलं.

''अरे मानस, अंधांसाठी ब्रेल लिपी असते ती चाचपडूनच वाचायची असते. त्यामुळे नाण्यांवरून बोटं फिरवली की ती किती रुपयांची आहेत ते त्यांना बरोबर समजतं. तुझ्या आजीला थोडीच येते ब्रेल लिपी?''

''म्हणजे आई, कोणत्याही गोष्टीचं आपल्याला जे कारण दिसतं, तेच खरं असतं असं नाही. आता बघ, काल रोहन सांगत होता की तो मध्ये गोव्याला ट्रिपला जाऊन आला ना, तर त्याचे आजोबा देवळात येत नव्हते. पण चर्चमध्ये मात्र आले. शिवाय तो म्हणतो, घरात तर त्याचे आजोबाच देवाची पूजा करतात. म्हणजे नास्तिक का काय म्हणतात, तसे तर नाहीत ते. मग गं?'' मानसच्या प्रश्नावर हसून आई म्हणाली, ''याचा अर्थ रोहनच्या आजोबांना बूट काढा घालायचा कंटाळा येत असणार. किंवा त्यांना धुळीचा त्रास होत असेल अनवाणी चालून. तिसरं कारण म्हणजे सॉक्स फाटके असले की बूट काढत नाहीत माणसं. चौथंही एक कारण म्हणजे रोज सॉक्स धुतले नाहीत की येतो तसा वास येत असेल त्यांच्या सॉक्सना. देवळांमध्ये जाताना बूट काढावे लागतात. चर्चमध्ये बूट घालून जाता येतं.''

''म्हणजे ना आई, कुठल्याही गोष्टीचं कारण ठरवताना खूपच विचार केला पाहिजे. म्हणजे बघ, मी जर तुला आता 'चॉकलेट दे' म्हटलं, तर मला भूकच लागली असेल असं नाही. फक्त आवडतं, म्हणूनही मी चॉकलेट मागू शकतो. होय ना?''

(पान ५ कॉलम १ वर)

आरोग्यम्

# अवयवदान

**-डॉ. छाया अजित देसाई**

*(हा लेख सर्वसामान्य जनतेकरिता आहे. त्यामुळे त्यात वैद्यकीयदृष्ट्या त्रुटी असू शकतात. -डॉ. छाया.)*

आतापर्यंत आपण ॲलर्जीवर माहिती पाहिली. ह्यापुढे आपण अवयवदानाविषयी थोडे जाणून घेऊ या. पुढील लेखमालेतून आपण अवयवदान व अवयवरोपण ह्या विषयी माहिती देण्याचा प्रयत्न करू या.

मृत्यू आपल्याला ह्या जगातून दूर घेऊन जात असला तरी आपले अवयव वाचवून आणि दान करून, आपण दुसऱ्या कोणा व्यक्तीचे प्राण वाचवू शकतो.

आपण कोणते अवयव वा गोष्टी दान करू शकतो?

१) रक्तदान - ब्लड डोनेशन

२) नेत्रदान - आय डोनेशन (कॉर्निया)

३) मूत्रपिंड - किडनी डोनेशन

४) यकृत - लिवर डोनेशन

५) त्वचा - स्किन डोनेशन

६) स्वादुपिंड - पॅनक्रियास डोनेशन

७) बोन मॅरो डोनेशन

८) हृदय - हार्ट डोनेशन

पण सर्वात महत्त्वाचे दान हे देहदान. देहदान केल्याने आपण शिकाऊ वैद्यकीय अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांची खूप मदत करू शकतो. त्यांना देहरचना शिकण्याकरिता आपण एक चांगला व स्वच्छ मृतदेह उपलब्ध करून देऊ शकतो.

अवयवदानाची निकड आज खूपच आहे. भारतात दरवर्षी ५ लाख रुग्ण अवयव उपलब्धतेअभावी मृत्यूमुखी पडतात. २ लाख रुग्ण यकृताच्या आजारामुळे, ५०,००० रुग्ण हृदयाच्या आजारामुळे, १.५० लाख रुग्ण मूत्रपिंडाच्या प्रतिक्षेत; तर १० लाख रुग्ण कॉर्नियाच्या प्रतीक्षेत आहेत.

भारतात इतकी निकड असूनही वर्षाला १ हजाराहून कमी अवयवरोपण शस्त्रक्रिया होतात. एका वर्षात भारतात जवळजवळ ९० लाखांहून अधिक व्यक्ती मृत पावतात. तरीही फारच अत्यल्प प्रमाणात अवयवदान केले जाते. बाकी रुग्ण मात्र अवयवदानाच्या प्रतिक्षेत मृत्यूमुखी पडतात.

हे चित्र बदलण्याकरिता जनजागृतीची गरज आहे. म्हणून अवयवदानाची माहिती जनसामान्यांपर्यंत पोहोचणे अतिशय आवश्यक आहे.

अवयवदान म्हणजे काय?

अवयवदान समजण्यासाठी आपण अवयवरोपणाविषयी (ऑरगन ट्रान्सप्लान्ट) जाणून घेऊया.

अवयवरोपण (ट्रान्सप्लान्ट) ही एक वैद्यकीय प्रक्रिया आहे. ज्या अन्वये एका रुग्णाचे निकामी झालेले अवयव शस्त्रक्रियेद्वारे काढून त्याजागी निरोगी व्यक्तीचे अवयव बसवले जातात. ह्या प्रक्रियेमुळे त्या रुग्णाच्या शरीरात हे अवयव व्यवस्थित काम करू लागतात व रुग्ण व्याधीविरहीत आयुष्य जगू शकतो. त्याला जणू नवीन जीवनदानच मिळते.

वैद्यकशास्त्र कितीही प्रगत झाले असले तरी काही वेळा प्रत्यारोपणाशिवाय काही इलाज नसतो.

प्रत्यारोपणामुळे जीवनशैली फारच सुधारते व रुग्णाला एक नवीन आयुष्य प्राप्त होऊ शकते. पण अवयवदानासाठी अवयव उपलब्ध झाले तरच हे शक्य आहे.

बहुतेक अवयव हे मृत व्यक्तीकडून (कॅडॅव्हरीक ट्रान्सप्लान्ट) किंवा ज्यांचा मेंदू काम करणे थांबवितो (ब्रेन डेड पर्सन) त्यांच्याकडून उपलब्ध होतात.

पण जीवित व्यक्तीसुद्धा आपले अवयव दान करू शकतात.

१) मूत्रपिंड २) यकृताचा छोटा भाग ३) फुफ्फुसे ४) स्वादुपिंड (पॅनक्रीया) अवयवदान करूनही दान केलेली व्यक्ती आपले आयुष्य निरोगीपणे जगू शकते.

रक्तदान हे तर आपण सर्वात मोठे दान समजतो. रक्तदान जिवीत व निरोगी व्यक्ती आपल्या आयुष्यात अनेकवेळा करू शकतात.

एक मृत व्यक्ती पंचवीस वेगवेगळे अवयव व टिश्यूज दान करू शकते. ह्या अवयवदानामुळे एक मृत व्यक्ती नऊ जणांचे प्राण वाचवू शकते. एवढे प्राण वाचू शकत असतील तर हे अवयव अग्निच्या भक्ष्यस्थानी घालवण्यापेक्षा त्यांचे दान करण्यासारखे पुण्य नाही.

तेव्हा मृत व्यक्तीच्या नातेवाईकांनी हा विचार करणे अतिशय स्तुत्य आहे, कारण निर्णय केवळ त्यांच्यावरच अवलंबून आहे.

अवयवप्रत्यारोपणाविषयी माहिती आपण लेखांच्या मालिकास्वरूपात करून घेऊ या.

*

# 'गुरुपौर्णिमा'

**श्रीमती नीला वेलकर**

आषाढ महिन्यातील पौर्णिमा ही 'गुरुपौर्णिमा' म्हणून ओळखली जाते. तिचे दुसरे नाव आहे 'व्यास पौर्णिमा'. वेदांच्या गूढ रहस्यांचे स्पष्टीकरण करण्यासाठी 'ब्रह्मसूत्र' हा महान ग्रंथ व सामाजिक लौकिक जीवनाचे दर्शन घडवणाऱ्या 'महाभारत' या ग्रंथाची रचना करणाऱ्या महर्षि व्यासाच्या स्मरणार्थ हा गुरुपौर्णिमेचा दिन साजरा केला जातो.

''गुरुः ब्रह्मा गुरुर्विष्णुः गुरुः देवो महेश्वरः।

गुरुसाक्षात्परब्रह्मो तस्मै श्री गुरवे नमः।।'

गुरुदेव हे साक्षात ब्रह्मदेव, विष्णु व महेश्वर या तीनही देवांसमान आहेत. ते साक्षात्परब्रह्मच आहेत. म्हणून गुरुदेवांना माझा नमस्कार असो.

ब्रह्मदेव सृष्टीची रचना करतात. पण गुरुदेव त्या सृष्टीतील मुख्य घटक जो मानव त्या मानवाच्या मनाची जडणघडण करून शाश्वत असणाऱ्या मूल्यांची निर्मिती त्याच्या मनात करतात. योग्य ते मार्गदर्शन करून मानवाला त्याच्या कर्तव्यांची जाणीव करून देतात. शाश्वत जीवनमूल्ये त्याच्या मनात रुजवून त्यांची जोपासना कशी करावी हे दाखवून देतात. त्याच्या मनाला योग्य तो आकार देतात, बुद्धीला प्रेरणा देतात, त्याचा आत्मविश्वास वाढवतात, मनोबल वाढवतात.

विष्णुदेव निर्माण केलेल्या सृष्टीचे पालन-पोषण व संवर्धन हे कार्य करतात. तद्वत् गुरुदेव मानवाच्या गुणांचे त्याच्या जीवन मूल्यांचे व संस्कारांचे वर्धन किंवा पोषण करून त्यांची शाश्वत जोपासना करतात.

महादेव निर्माण केलेल्या सृष्टीचा प्रलय घडवून आणतात. त्याचप्रमाणे गुरुदेव हे मानवी समाजातील विकृतींचा, मानवी मनातील दुष्ट विचारांचा, वासनांचा नाश करतात. आपल्या सदुपदेशाने व आचरणाने सत्कर्मे करण्याकडे मानवाला प्रवृत्त करतात. मानवामध्ये बंधुभाव व समता कशी निर्माण होईल असे ते प्रयत्न करतात. तिन्ही देवांची ब्रह्मा, विष्णु व महेश यांची कार्ये भिन्न आहेत. निर्मिती, पालन व संहार (क्रीयेशन, मेन्टनन्स अँड डीस्ट्रक्शन) पण ही तीनही कार्ये एकटे गुरुदेव आपल्या उपदेशाने, संस्कारांनी व स्वतःच्या आचरणाने घडवून आणतात. तीनही देवांची कार्ये करण्याची शक्ती व सामर्थ्य गरुदेवांमध्ये एकवटले आहे. ते साक्षात्परब्रह्म स्वरूपच आहेत. गुरुदेवांमध्ये 'सत्-चित्-आनंद' स्वरूप परमात्म्याचा वास आहे. त्या सत्यज्ञानाचे स्मरण ह्या दिवशी केले जाते. आपल्या मनातील सुषुप्तशक्ती जागृत केली जाते. आपले दुःख, रोग, अज्ञान दूर करून आपल्या मनात भगवंताबद्दल प्रेम, श्रद्धा व भक्ती निर्माण करून आपले आंतरिक सामर्थ्य वाढवले जाते. मनातील दीनता, हीनता व क्षुद्रता दूर करून ईश्वराबद्दल प्रिती व भक्तिभावना जागृत केली जाते.

जीवनात सुखदुःखे येतात, हर्षशोक येतात व जातात. ही सुखदुःखे नश्वर आहेत. नश्वरता शरीराचा धर्म आहे. जे जन्म घेते ते सर्व नाशीवंत आहे. जन्म घेतो त्याला मृत्यू हा निश्चित आहे. 'जातस्य हि ध्रुवो मृत्युः। ध्रुवो जन्म मृतस्य च।।' जन्ममृत्यूच्या चक्राप्रमाणे सुखदुःख, चिंता, भय जीवनात येतात व जातात. पण एक असे तत्त्व आहे जे पूर्वी होते, आज आहे व नंतरही राहील' ते आहे आत्मतत्त्व, जे जाणण्यासाठी दृढनिश्चयी बनावे. या नश्वर संसाराविषयी, दुःख देणाऱ्या नश्वर जीवनाविषयी आपल्याला प्रेम वाटते त्या नश्वर वस्तू मिळवण्यासाठी आपण किती धडपडतो, कष्ट करतो. त्याच्या अर्ध्यापटीने तरी आपण भगवंताचे मर्म जाणण्यासाठी, ध्यान करण्यासाठी भक्ती करण्यासाठी प्रयत्न केले तरी आपले जीवन सार्थकी लागेल.

भक्तांच्या मनामध्ये चांगल्या संस्कारांचे बीज रुजवण्याचे कार्य सद्गुरु व त्यांचा योग्य तो उपदेश करू शकतो. संत ज्ञानेश्वरांनी 'ज्ञानेश्वरी' ग्रंथ (संस्कृत भाषेत असणाऱ्या 'श्रीमदभगवद्गीता' या ग्रंथाचा भावार्थ) पूर्ण झाल्यावर आपले गुरु संत निवृत्तिनाथ यांजकडून 'पसायदान' मिळावे अशी विनंती आपल्या गुरूंना केली. पसायदान म्हणजे 'प्रसाद-कृपा' हा कृपाप्रसाद अखिल मानवजातीच्या कल्याणासाठी असावा; असे मागणे त्यांनी मागितले. 'पसायदान' मागताना संत ज्ञानेश्वर म्हणतात की सर्व मानवांच्या मनांतील दुष्ट विचार व प्रवृत्ती नष्ट व्हाव्यात' दुष्टांचा नाश व्हावा, असे न म्हणता दुष्टांच्या दुष्ट प्रवृत्तींचा नाश व्हावा असे ते म्हणतात.

'जे खळांची व्यंकटी सांडो। तया सत्कर्मी रति वाढो।

भूतां परस्परे जडो। मैत्र जीवांचे।।''

दुष्टांच्या दुष्ट प्रवृत्ती व विचार नष्ट होऊन सत्कर्म म्हणजे चांगली कर्मे करण्याकडे त्यांची प्रवृत्ती होवो- प्रेम भावना निर्माण होवो सर्व मानवांमध्ये परस्परांविषयी बंधुभाव व प्रेम निर्माण होवो. मनात चांगले विचार निर्माण होण्यासाठी त्यांना सदैव सज्जनांचा सहवास घडो म्हणजे सज्जनांच्या संगतीत सदैव राहिल्याने त्यांच्या मनातील वाईट विचार आपोआपच नष्ट होऊन चांगले विचार सुचतील. सज्जन

(पान ६ कॉलम ३ वर)

अनुभव

# तुफान मेल, ही दुनिया एक तुफान मेल

**-विनय त्रिलोकेकर**

(मागील अंकावरून)

माझा मित्र आणि चौगुलेतील सहकारी, फ्रान्सिस सौदी अरेबियातून सुंदर पत्रं पाठवीत असे, सारे तपशील बाळगून (He has a keen eye for details), नीटनेटके, शिस्तबद्ध आणि मनोरंजक. आपल्या सौदीतून पाठवलेल्या पहिल्या पत्रात असे लिहिले होते,

*"Vinay, sorry I couldn't write to you earlier. I'm sending this from my colorful* (colourful) *electronic type -writer. I've a very busy sketjule* (Schedule). *Working here is different, but very satisfying. My boss is fantastic. He is small and stout (a rare feature for an American, you see.), with short arms,short legs and a round head with a red pimply face, planted directly on his trunk, which is also round and short, and with apparently no neck, which gives him a froggish appearance. But don't go by his looks. Beneath that thick round head there is a very sharp and clever brain and under that thick and stout chest there is a kind heart. When he appreciates your work he gives solid pat on your back or even hugs you and exclaims, "Very nice work,pal!" I feel very embarrassed when he does this."* (असा आहे माझा लाजाळू मित्र!)

आपल्याला एक गोष्ट समजलीच असेल की मी का म्हंटले होते की (He has a keen eye for details) आणि दुसरी गोष्ट की त्याने इतक्या थोड्या अवधीत अमेरिकन शब्द आपले करून घेतले होते.

पत्रलेखन गेले. भेटीगाठी हळूहळू बंद होऊन त्याजागी भावनाविरहित एसएमएस ईमेलमुळे पत्रलेखनातील श्रीमंती आणि गोडवा आपण विसरलो आहोत. गप्पांमधून होणाऱ्या हास्य-विनोदापासून वंचित झाल्याने आपण सतत काळजी करणारे किंवा दुसऱ्यांचा हेवा करणारे प्राणी बनलो आहोत. ह्या धावपळीच्या जीवनात आपण सारे घडत असलेले क्षणच जगू लागलो आहोत. घोषणाबाजीत वेळ दवडू लागलो आहोत. अर्थपूर्ण संवाद विणणे हेच मुळात विसरलो आहोत. आता आपली सायंकाळ सूर्यास्ता-बरोबरच संपते. पूर्वीप्रमाणे आपण जुन्या आठवणींच्या आनंदात रेंगाळू शकत नाही. ज्या वेगाने लिहिण्याची कला नष्ट होत आहे तितक्याच वेगाने संवाद साधण्याचे कौशल्य आपण हरवून बसलो आहोत. ह्या दोनही गोष्टी साधण्यासाठी तल्लख बुद्धीपेक्षा मोकळे आणि स्वच्छ-निर्मळ मन असायला लागते. पण आज आपल्या साऱ्यांच्या डोक्याचा झाला आहे विचका.

पण 'आजचा दिवस माझा' असे म्हणत आयुष्य रेटण्यात काय मजा आहे? एक एक घडणाऱ्या क्षणाचा आनंद उपभोग घेण्यातच गंमत असते! आपली धावपळ थोडी कमी करूया. आपल्या तुफान मेलचा वेग मंद करूया. स्वप्रेरीत आणि स्वाभाविकपणे पुन: नाचूया! मनमोकळेपणाने हसा, आपल्या आप्तेष्ट आणि मित्र परिवारांबरोबर वेळ घालवा आणि आठवणींना उधाण देऊन आनंद लुटा.

*

---

(पान ३ कॉलम ४ वरून)

''बरोब्बर. आपण लग्नाला जातो, तेव्हा किती पदार्थ असतात ना जेवणात? पण जेवणानंतर आईस्क्रीम खातातच ना माणसं? पोटात जागा नसली तरी आईस्क्रीम खावसंच वाटतं, हेच खरं.''

तेवढ्यात आजोबांची हाक आली, ''मानस, आईला म्हणावं, चार वाजले.'' 'हो सांगतो', मानस म्हणाला. मग आईला म्हणाला, ''आई, याचा अर्थ आजोबांना चहा हवाय. पण म्हणजे त्यांना तहान लागलीय असंही नव्हे. चहा प्यायची इच्छा झालीय, असंच ना?''

होकारार्थी मान हलवून आई म्हणाली, ''तल्लफ, असं म्हणतात त्याला.''

''मग आई, मला पण आता खेळायची तल्लफ आलीय म्हटलं तर बरोबर ना?''

''नाही मानस. तल्लफ ही खाण्या-पिण्याची असते. खेळायला जावसं वाटतंय ना तुला? पण आधी अभ्यास संपव. तुझा अभ्यास संपेपर्यंत उन्हंही जरा उतरतील.'' आई म्हणाली.

तेवढ्यात बेल वाजली. आजीने येऊन दार उघडायलं. सुरक्षा दरवाजाच्या आत पोस्टमन पत्र टाकून गेला होता. आजीने पत्र उचलून आईला दाखवलं, ''बघ गं. आपलंच आहे ना? वाट्टेल त्यांची पत्रं आपली टाकून जातो आपल्या दारात.''

मानस आणि आई हळूच एकमेकांकडे पाहून हसले. नशीब, की आजीने पाहिलं नाही.

(दूरध्वनी:०२२-२४१५०६६५
मोबाईल: ९९६९०२८९६७
८७७९१४०४२)

*

---

## पत्र प्रतिक्रिया

माननीय सुहासिनी कीर्तिकर यांना नम्र अभिवादन.

'प्रभु तरुण' मे, २०१९ च्या अंकात शेवटल्या पानावर 'भावांजली' या सदरात आपण जी श्रीमती कला रामानंद जोशी - स्वातंत्र्य सैनिकेच्या निधनाची बातमी प्रसिद्ध केलीत, ती आपण 'लोकसत्तेत' आलेल्या मजकूराच्या आधारे होती असे नोंद केले आहे ते खालीलप्रमाणे :-

''स्वातंत्र्यपूर्व काळात देशासाठी कृतीशील असलेल्या विचारी व्यक्तींमध्ये चंपूताई कोठारे यांचा समावेश होतो. त्यासाठी अनेकवेळा त्यांना तुरुंगवासही भोगावा लागला होता. त्यांची कन्या कला हिच्यावरही देशप्रेमाचे संस्कार असल्यामुळे त्यादेखील १९४२ च्या 'चले जाव' चळवळीत सहभागी होऊन तुरुंगात गेल्या होत्या. या कारणाने स्वातंत्र्य मिळाल्यावर शासनाने त्यांची म्हणजे सौ. कला रामानंद जोशी यांची दखल घेऊन त्यांना सन्मानीत केले होते. कला जोशींचे निधन ६ एप्रिल २०१९ रोजी झाले.''-

आपण नोंद केले आहे की, याबाबतचा मजकूर लोकसत्तेत आला होता. कुठल्या तारखेच्या लोकसत्ता अंकात तो मजकूर आला होता ते कृपा करून मला कळवावे आणि आपल्याकडे त्याची कॉपी असल्यास त्या कॉपीची झेरॉक्स कॉपी मला पाठवून द्यावी. कारण माझ्या मते लोकसत्तेतील लेखातील मजकूर विपर्यास (डिस्टॉर्ट) करणारा आहे. सौ. चंपूताई कोठारे यांना अनेकवेळा तुरुंगत जावे लागले नसून त्या फक्त संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत (जी चळवळ कॉ. डांगे यांच्या नेतृत्वात चालली होती) तेव्हा तीन आठवडे सत्याग्रही म्हणून येरवड्याला इतर सत्याग्रहींच्या समवेत महिला जेलमध्ये ठेवले होते. कला जोशी ही चंपूताईंची कन्या होती आणि १९४२ च्या 'चले जाव' चळवळीत तिने विद्यार्थीदशेमध्ये ब्रिटीश सोल्जर्सने चालविलेल्या मारहाणीच्या हैदोसाची पांगापांग करण्यासाठी शिवाजी पार्क येथील बिल्डींगच्या गच्चीवरून सोडावॉटरच्या बाटल्या गोऱ्या सोल्जर्सवर फेकून त्यांची पांगापांग केली होती, आणि त्यासाठी तिला एक वर्षाची सजा झाली होती. ती यरवड्या जेलमध्ये होती. १५ ऑगस्ट १९४७ नंतर काँग्रेस सरकारने तिचा सत्कार केला व तिला पेन्शन चालू केले होते. कला रामानंद जोशी या मुंबई युनिव्हर्सीटीचे चान्सेलर माननीय राम जोशी यांच्या धाकट्या भावाची पत्नी म्हणून राम जोशींना तिच्याबद्दल अभिमान होता. ही सत्य कहाणी आहे. म्हणून आपण आपल्या अंकात याला प्रसिद्धी द्यावी.

''चंपूताईंचे जेव्हा निधन झाले तेव्हा मी त्यांची भाची म्हणून त्यांच्या समाजकार्याचा गौरव करण्यासाठी 'प्रभू प्रभात'चे संपादकमहाशय माननीय प्रमोद नवलकर यांच्याकडे काही रक्कम देऊन त्या रक्कमेच्या व्याजातून दरवर्षी 'प्रभू प्रभात' तर्फे आपल्या ज्ञातीतील 'आदर्श आई' म्हणून योग्य भगिनीचा सत्कार करावा अशी सूचना केली होती. प्रमोद नवलकर आणि वंदना नवलकर हा समारंभ दरवर्षी करीत असत हे त्यांच्या रेकॉर्डवर आहे, आणि मलाही त्या समारंभाचे निमंत्रण असायचे. विशेषत: प्रमोद नवलकर यांना मी माहिती दिली होती की, त्या कॉ. डांगे यांना भारताचे योग्य राजकीय मार्गदर्शक म्हणून मानत असत. चंपूआत्याने रशियन लेखक मॉक्झिम गॉर्की या लेखकाने लिहिलेली 'आई' ही कादंबरी वाचली होती. त्या कादंबरीत 'आई' आपल्या अपत्यांना देशप्रेमाचे व देशभक्तीची प्रत्यक्ष कृती कशी करावी, (विशेषत: जेव्हा आपला 'शत्रू' प्रबळ असतो तेव्हा) अशा वेळी 'आई' आपल्या प्रत्यक्ष कृतीतून देशभक्तीची संस्कृती कशी रुजविते... हे स्पष्ट केले आहे, आणि म्हणून मी प्रमोदजींना दरवर्षी चंपूताईंच्या स्मृतींचा सत्कार करण्यासाठी ती रक्कम दिली होती. की ज्याच्या व्याजातून चंपूताईची आठवण काढत त्यांच्यासारखी ज्ञातीतील महिलांना देशभक्तीची प्रेरणा दिली जाईल आणि हा माझा प्रयत्न प्रमोदजींनी व वंदनाताईंनी सातत्याने कृतीत उतरविला आहे. खरेतर 'प्रभू तरुणा'ला ही माहिती ज्ञात असावी; पण समजा जर ती ज्ञात नसेल तर मी ती येथे प्रसिद्धीसाठी देत आहे.

धन्यवाद!

आपली नम्र,
सुंदरताई नवलकर

ॲड. उज्ज्वला गोविंदराव आगासकर यांनी मला कला जोशी यांच्या निधनाची बातमी कळवली तेव्हा मी प्रवासात असल्याने स्वत: वृत्तपत्रसंदर्भ पाहू शकले नाही. उज्ज्वला यांचा संदर्भ मला पुरेसा होता. बातमीत फार मोठी गफलत झाली आहे असे मला वाटत नाही. (आपले पत्रही माझे घर बंद असल्याने श्रीम. सुहासिनी कोठारे यांनी कुरियर केले होते; ते परत गेले. त्यामुळे आपल्या तक्रारीची दखल घेण्यास उशीर झाला.) 'आई' पुरस्काराबद्दल मला माहिती आहे.

तरीही चुकभूल क्षमस्व. आपण तत्परतेने पत्रप्रतिक्रिया दिल्याबद्दल धन्यवाद.

-संपादक

## प्रभु तरुण आश्रयदाते

१) सौ. विमल व श्री. माधव नायक,
२) सौ. नलिनी व श्री. रविंद्र रामराव मानकर,
३) सौ. अनामिका बी. ए. एल.एल.बी.
४) कै. नटवर्य नारायण रामराव झावबा
५) कै. सॉ. मोतिराम विनायक जयकर
६) आद्य संपादक कै. विष्णु कृष्ण कोठारे
७) कै. रावसाहेब चंद्रकांत बालमुकुंद वेलकर
८) कै. सौ. सुशीला यशवंतराव कीर्तीकर कै. सौ. सुशीला व श्री. मोरेश्वर वि. प्रधान
९) सौ. मीरा व श्री. रविंद्र नानूजी दळवी
१०) कै. सौ. शलाका (अरुणप्रभा) शैलकुमार श्रीकृष्णनाथ दळवी
११) कै. श्रीमती चंपुबाई आणि कै. आनंदराव सुंदरजी धराधर
१२) कै. सौ. रोहिणी (रत्नप्रभा) श्रीकर राणे
१३) सौ. निलीमा व श्री. सूजन केशवराव राणे
१४) कै.श्रीमती रोझाबाई आणि कै. बाळाराम केरोबा नायक
१५) कै. शरद विनायक कीर्तिकर यांच्या स्मरणार्थ अनामिक
१६) कै. सॉ. दिलीप रघुनंदन कोठारे
१७) कै. श्रीमती कमलजा आनंदराव अजिंक्य
१८) कै. दिवाळीबाई व कै. डॉ. वामनराव आनंदराव विजयकर
१९) कै. विष्णुराज बाळाराम नायक
२०) ॲड. सदाशिव आनंदराव धुरंधर
२१) कु. कस्तूर मोठाबाई जयकर
२२) कै. कमलिनी रमाकांत प्रधान
२३) कै. नटवर्य शरद श्रीकृष्णनाथ गणपतराव दळवी
२४) आद्य मराठी लघुलिपीकार कै. भुजंगराव रामचंद्र मानकर
२५) कै. वामन मोरेश्वर प्रभाकर
२६) कै. चंद्रकांत नारायण विजयकर, कै. कुंजविहारी वाय. जी. तळपदे, कै. प्रविण चंद्रकांत नारायण, विजयकर, कै. वैभव कुंजविहारी वाय. जी. तळपदे यांच्या स्मरणार्थ एक हितचिंतक
२७) कै. डॉ. विद्याधर चंद्रकांत नारायण विजयकर यांच्या स्मरणार्थ हितचिंतक
२८) कै. पूर्णचंद्र केशरीनाथ राव व कै. सौ. शीला पूर्णचंद्र राव यांच्या स्मरणार्थ
२९) डॉ. राम गोविंदराव नवलकर
३०) सौ. शुभांगी राम नवलकर
३१) सौ. रीटा आणि श्री. मंदार माधवराव नायक
३२) कै. सौ. विजया व श्री. प्रकाश माधव नायक या त्यांच्या आईवडिलांच्या स्मृत्यर्थ उन्मेष प्रकाश नायक
३३) सौ. वृंदा आणि श्री. शाम विनायक जयकर
३४) कै. श्रीमती जयश्री आणि कै. श्री. जयवंत विश्वनाथ कीर्तिकर स्मृत्यर्थ श्री. उमेशचंद्र जयवंत कीर्तिकर
३५) कै. श्रीमती प्रतिमा आणि कै. श्री. धाकलेश्वर बाळाजी जयकर स्मृत्यर्थ सौ. सुप्रिया उमेश कीर्तिकर

## प्रभुतरुणास देणगी

✶ श्री. अनिल रवीन्द्र तळपदे यांजकडून त्यांच्या मातोश्री श्रीमती कस्तुर रवीन्द्र तळपदे आणि वडील श्री. रवीन्द्र मोरेश्वर तळपदे यांच्या स्मरणार्थ रु. २५०१/-

✶ श्री. अक्षय राजेन्द्र तळपदे यांजकडून आजीव सदस्यत्व रु. ५००/-

सर्व देणगीदारांचे आभार.

*

## अभिनंदन

✶ दिनांक २४ जून रोजी मराठी भाषेसंदर्भात आझाद मैदानात अनेक भाषाप्रेमींनी धरणे धरले होते. त्यात प्रा. सुहासिनी कीर्तिकर आणि श्री. मनोज धुरंधर सहभागी होते. श्री. मनोज यांनी मराठीवरील आपली एक कविताही तेथे सादर केली.

✶ श्री. संजीव विजय तळपदे यांचे हिंदीत लिहीलेल्या संवाद लेखन असलेले हॉलिवूडमध्ये वितरीत झालेले चित्रपट म्हणजे वॉल्ट डिसनेज् डंबो आणि वॉर्नर ब्रदर्सचे रहस्यमय चित्रपट मे महिन्यात वितरीत झाले.

✶ 'आरण्यक' या नाटकाच्या प्रकाश योजनेसाठी संस्कृती कला दर्पण २०१९ चा पुरस्कार श्री. शीतल तळपदे यांना बहाल करण्यात आला. उत्कृष्ट प्रकाशयोजना आणि श्री शीतल तळपदे यांचे शुभसमीकरणच झाले आहे.

✶ आकाशवाणीवरील अस्मिता वाहिनीतील 'गंमतजंमत'मध्ये डॉ. सुमन नवलकर यांची बालनाटिका सादर झाली.

सर्वांचे मन:पूर्वक अभिनंदन.

## पाठारे प्रभु सोशल समाज

शनिवार, दि. १३ जुलै २०१९ रोजी दुपारी ४ वाजता पाठारे प्रभु चॅरिटीजच्या व्यंकटेश मंदिरात 'अभंगयात्रा' संस्थेने आयोजित केली आहे. त्याचा वृत्तांत पुढील अंकी. तसेच समाजाची वर्षा सहल दि. २१ जुलै २०१९ रोजी जाणार आहे. समाजाची वार्षिक सर्वसाधारण सभा रवि. दि. १८ ऑगस्ट २०१९ रोजी प्रभु सेमिनरी शाळा, भाई जीवनजी लेन, ठाकुरद्वार येथे सायं. ५ वाजता घेण्यात येईल.

*

## पाठारे प्रभु महिला समाज

समाजाची वार्षिक सर्वसाधारण सभा रवि. २५ ऑगस्ट २०१९ रोजी प्रभु सेमिनरी शाळा, भाई जीवनजी लेन, ठाकुरद्वार येथे दुपारी ठीक ४.०० वाजता आयोजित केली आहे. यावेळी निबंधस्पर्धाही होईल. स्पर्धेचा विषय स्त्री- एक तारेवरची कसरत. तसेच काव्यस्पर्धाही होईल. विषय आहे - बालपण. स्पर्धेसाठी निबंध आणि कविता घरून लिहून आणणे.

*

### चुकीची दुरुस्ती

दहावी

कु. आरती जयेश कोठारे ८८%

## प्रभुतरुणाची डायरी

### विवाह सुवर्णमहोत्सव

१८-०५-१९ श्री. सुरेश शामराव कोठारे कु. अनुपमा रामदत्त अजिंक्य

### मरण

| | | | |
|---|---|---|---|
| २५-०५-१९ | प्रा. शालिनी शामराव कोठारे, | वय ९२, | नागपूर |
| २९-०६-१९ | डॉ. उदय रवींद्र दळवी | वय ६८, | दादर |
| ०१-०७-१९ | सौ. अमीना वीरपाल राणे | वय ८१, | अंधेरी |
| ०५-०७-१९ | श्रीम. गीता प्रिभुनवानी (पूर्वाश्रमीच्या कु. गीता मोतीराम नवलकर) | वय ९२, | कल्याण |

(पान ४ कॉलम ४ वरून)

कसे असतात? ज्ञानेश्वर म्हणतात की सज्जन हे सूर्याप्रमाणे असतात. अज्ञानाचा अंध:कार नाहीसा करून ज्ञानाचा प्रकाश सर्वत्र पसरवणारे असतात. सज्जन हे सूर्याप्रमाणे तेजस्वी असतात; पण त्यांचे तेज हे तापदायक नसते. मन:स्ताप देणारे नसते. 'मार्तंड जे तापहीन'. सज्जन हे चंद्राप्रमाणे सौम्य व शीतल प्रकाश देणारे असतात. चंद्रावर तरी कलंक आहे, सज्जन हे निष्कलंक आहेत - त्यांना कुठलाही कलंक नाही. असे हे सज्जन दयासागर कृपासिंधुच आहेत. जसे कल्पवृक्ष हे मनातील इच्छा तृप्त करणारे असतात त्याप्रमाणे सज्जन हे भक्तांच्या मनातील चांगले विचार व इच्छा तृप्त करणारे असतात.

ज्ञानेश्वर म्हणतात, 'दुरितांचे तिमिर जावो। विश्वस्वधर्मसूर्ये पाहो। जो जे वांछिल तो ते लाहो प्राणिजात।।'

सर्व मानवांच्या मनातील दुष्ट विचारांचा व प्रवृत्तींचा अंध:कार नाहीसा झाल्यावर - ज्ञानाचा प्रकाश सर्वत्र पसरल्यावर प्रत्येकाला स्वत:च्या कर्तव्यधर्माची जाणीव झाल्यावर दुष्ट विचार कुणाच्याही मनात येणार नाहीत. मानवांच्या मनातील इच्छादेखील योग्य त्या कर्तव्याची बांधिलकी ठेवणाऱ्या असतील. अनाठायी किंवा विकृत विचार कुणाच्याही मनात येणार नाही. सर्वांच्या सर्व इच्छा सत्संगाने पूर्ण होतील. अखिल मानवजात तृप्त व समाधानी होवो अशी मागणी संत ज्ञानेश्वरांनी पसायदान मागताना केली व त्यांच्या गुरूंनी निवृत्तिनाथांनी ती मान्य करून त्यांना तृप्त केले.

*

## परीक्षेतील सुयश

**दहावी (एस.एस.सी.)**

कु. श्रिया कौशिक जयकर ८१%

आर्य समीत विजयकर ६६.२०% ३३१/५००

पार्थ इंद्रजित कीर्तिकर ८१.०२% ४०९/५००

**बारावी (कला)**

नील सतेज राणे, ७४.७७% ४८६/६५०

**बारावी (कॉमर्स)**

हर्ष राजेश देसाई ६२ %

**बारावी (सायन्स)**

कु. लीना नील कीर्तिकर ७७%

**पोस्ट ग्रॅज्युएट डिप्लोमा इन मॅनेजमेंट (फायनान्स) (वेलिंगकर इन्स्टिट्यूट)**

श्री. संकेत शेखर नवलकर ८०%

## भावांजली

✶ शालिनी शामराव कोठारे या श्रीमती बिंझाणी महिला महाविद्यालयाच्या माजी प्राचार्या होत्या. माझ्या समजुतीप्रमाणे आपल्या ज्ञातीतील त्या पहिल्या महाविद्यालय महिला प्राचार्या. नागपूर विद्यापीठातून त्यांनी इतिहास विषय घेऊन एम.ए. केले. नंतर इंग्लिश विषय घेऊनही त्यांनी एम.ए. केले. इंग्लीश विषयात त्या विद्यापीठातून दुसऱ्या आल्या होत्या. शेरपा तेनसिंग यांची कन्या हिमा यांच्या मार्गदर्शनाखाली १९६१ साली हिमालयावर गिर्यारोहणासाठी पहिली महिला तुकडी गेली. त्यात त्यांचा समावेश होता. विशेष म्हणजे अशी महिलांची गिर्यारोहक तुकडी असावी, यासाठी शालिनीताईंनीच पंतप्रधान जवाहरलाल नेहरूंना साकडे घातले होते. ते मान्य झाल्यामुळे आधी प्राथमिक शिक्षण (बेस कॅम्प), मग थेट हिमालयावर गिर्यारोहण याचा लाभ महिलांना झाला. आपल्या ज्ञातीतील लेखिका सौ. कल्पना सुभाष कोठारे यांच्या त्या ज्येष्ठ भगिनी होत्या.

प्राचार्य शालिनी यांना आमची भावांजली.

✶ सौ. अमीना वीरपाल राणे यांचे देहावसान झाले. पाठारे प्रभु चॅरिटीजचे माजी अध्यक्ष आणि कार्यकारिणी सदस्य श्री. वीरपाल राणे यांच्या चॅरिटीजमधील अखंड समाजसेवेला त्यांनी नेहमीच 'मम' म्हटले. हे त्यांचे अप्रत्यक्ष योगदान महत्त्वाचेच. त्यांना आमचा आदरपूर्वक मानाचा मुजरा.

हे मासिक मुद्रक, प्रकाशक श्रीमती सुहासिनी कीर्तिकर यांनी मालक बोर्ड ऑफ कंट्रोल प्रभुतरुण करिता मे. स्नेहेश प्रिंटर्स, ३२०-अ, शाह अँड नाहर इंडस्ट्रीयल इस्टेट, अ-१, धनराज मिल कंपाऊंड, सीताराम जाधव मार्ग, लोअर परेल, मुंबई-४०००१३ येथे छापून पारिजात बी-३, युनियन बँक एम्प्लॉईज को-ऑप. हौ. सोसायटी, पटेल इस्टेट, जोगेश्वरी (प.), मुंबई-४००१०२ येथे प्रकाशित केले.

संपादक: श्रीमती सुहासिनी कीर्तिकर RNI NO. 14613/67